# कापूस शेतीतील महिलांच्या आरोग्य व पोषणासाठी धुळे जिल्ह्यात 'वात्सल्य प्लस' उपक्रम कार्यान्वित

- युनिसेफ, जिल्हा प्रशासन, कृषी विज्ञान केंद्र, धुळे यांचा संयुक्त पुढाकार; ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

धुळे | दिनांक: ११ एप्रिल २०२६

कापूस शेतीमध्ये राबणाऱ्या गर्भवती महिला, स्तनदा माता आणि प्रजननक्षम वयोगटातील महिलांच्या आरोग्य व पोषणाचे रक्षण करण्यासाठी धुळे जिल्ह्यात 'वात्सल्य प्लस' हा विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. युनिसेफच्या सहकार्याने महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यांत राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमांतर्गत धुळे जिल्ह्यातील सर्वाधिक कापूस लागवड क्षेत्र असलेल्या धुळे, शिंदखेडा आणि शिरपूर या तीन तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

कापूस शेतीमध्ये लागवडीपासून ते काढणीपर्यंत विविध रासायनिक कीटकनाशकांची फवारणी केली जाते. या रसायनांचा थेट संपर्क आल्यास गर्भवती महिलांच्या गर्भातील बालकांवर आणि स्तनदा मातांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. वाढते तापमान, जड ओझे वाहणे आणि कामाच्या व्यापात पोषणाकडे होणारे दुर्लक्ष या जोखीम घटकांविषयी जनजागृती करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा यशस्वी

'वात्सल्य प्लस' प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात आरोग्य आणि महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर, दुसऱ्या टप्प्यात ७ ते १० एप्रिल २०२६ या कालावधीत ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण चार सत्रांत पार पडले.

प्रशिक्षण स्थळे: पंचायत समिती (शिरपूर व शिंदखेडा) आणि कृषी विज्ञान केंद्र (धुळे).

सहभागी कर्मचारी: २५० कृषी सखी, २७ आशा गटप्रवर्तक, १२ प्रभाग समन्वयक तसेच ग्रामपंचायत व कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन

या प्रशिक्षणात कृषी विज्ञान केंद्र, जिल्हा परिषद आरोग्य विभाग आणि युनिसेफ मुंबई येथील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये शास्त्रीय पद्धतीने कापूस लागवड, सुरक्षित फवारणी, गरोदर व स्तनदा मातांचे पोषण आणि हवामान बदलामुळे पिकांवर पडणाऱ्या किडींचे नियंत्रण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

मार्गदर्शक म्हणून डॉ. विशाल पाटील (वैद्यकीय अधिकारी), कृषी विज्ञान केंद्र धुळे येथील पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील व डॉ. आतिश पाटील (शास्त्रज्ञ), आहारतज्ज्ञ श्रीमती राऊत व श्रीमती प्राची काळे, डॉ. गोपाळ पंडगे (युनिसेफ राज्य सल्लागार), श्री. नितीन वसईकर (विभागीय सल्लागार), श्री. राज बासेकर, श्री. सम्राट खांडेकर (MGIMS वर्धा) यांनी तांत्रिक माहिती दिली.

प्रशासकीय पाठबळ

धुळे जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी आणि प्रमुख कृषी विज्ञान केंद्र , धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाची जिल्ह्यात यशस्वी अंमलबजावणी केली जात आहे.

प्रमुख उद्दिष्ट: कापूस शेतात काम करणाऱ्या महिलांनी कीटकनाशकांपासून स्वतःचा बचाव कसा करावा, कामाच्या ठिकाणी योग्य पोषण कसे घ्यावे आणि हवामान बदलाच्या काळात आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याबाबत गावपातळीवर जनजागृती करणे हे या प्रकल्पाचे मुख्य सूत्र आहे.



